**ठळक बातम्या**

- राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन २७ जून ते १२ जुलै दरम्यान, २८ जून रोजी अर्थसंकल्प

- राज्यातल्या सुमारे साडे बाराशे महसुली मंडळात चारा डेपो उभारायला राज्य सरकारची परवानगी

- आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना सर्व आवश्यक सोयी सुविधा देण्याचे राज्य सरकारचे प्रशासनाला आदेश

**आणि**

- मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामुळं देशातल्या कलाकारांना जागतिक व्यासपीठ मिळेल, माहिती प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांचं प्रतिपादन

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन २७ जून ते १२ जुलै या कालावधीत मुंबईत होणार आहे. या अधिवेशनात २८ जून रोजी राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे. या अधिवेशनाचं कामकाज १३ दिवस चालणार आहे. विधानसभा आणि विधानपरिषदेच्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत आज हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत

पाटील, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार उपस्थित होते.

<><><><><>

राज्यातल्या अनेक भागात पावसाचं आगमन झालं असलं तरी अनेक विभागात अद्यापही समाधानकारक पाऊस झालेला नाही म्हणून १ हजार २४५ महसुली मंडळात चारा डेपो उभारायला शासनानं परवानगी दिली आहे. राज्याचे महसूल तथा पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री, राधाकृष्ण विखे पाटील यांनी ही माहिती दिली. शासनाच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून जनावरांचं पालन करताना कोणत्याही अडचणी येणार नाहीत असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सध्या राज्यात सुमारे ५१२ लाख मेट्रिक टन हिरवा चारा तर सुमारे १४४ लाख मेट्रिक टन सुका चारा उपलब्ध आहे.

<><><><><>

वैद्यकीय आणि दंत वैद्यकीय प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेत पेपरफुटी आणि अन्य गैरप्रकार झाल्याचा आरोप करत त्याची चौकशी केंद्रीय अन्वेषण संस्थेमार्फत करण्याची मागणी करणाऱ्या विविध याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय परीक्षा संस्था तसंच केंद्र सरकारला नोटिसा बजावल्या आहेत. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या सुट्टीकालीन पीठाने सीबीआय आणि बिहार राज्यसरकारकडूनही जबाब मागितला असून त्याकरता दोन आठवड्यांची मुदत दिली आहे.

नीट ची परीक्षा देणाऱ्या परीक्षार्थींच्या हिताला धक्का पोहोचणार नाही याची काळजी केंद्र सरकार घेईल, असं आश्वासन आज केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान

यांनी दिलं. विद्यार्थ्यांच्या समस्या समभावाने आणि सुयोग्य पद्धतीने सोडवू असं ते म्हणाले. सध्या हे प्रकरण न्याय प्रविष्ठ असून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशनानुसार केंद्र सरकार कार्यवाही करेल, असंही ते म्हणाले. दरम्यान, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सरकारवर कडक शब्दात टीका केली आहे. २४ लक्ष विद्यार्थ्यांच्या आशा सरकारनं धुळीला मिळवल्याचं त्यांनी समाजमाध्यमांवर टाकलेल्या पोस्ट मध्ये म्हंटल आहे.

**<><><><><>**

आषाढी वारीच्या नियोजनासाठी आज मुंबईत विशेष बैठक  झाली. या बैठकीत वारीच्या अनुषंगानं  करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी प्रशासनाला आदेश दिले.

या बैठकीला सहा प्रमुख दिंड्यांचे प्रतिनिधी, फडांचे प्रमुख, वारकरी संप्रदायाचे बंडातात्या कराडकर, पंढरपूर संस्थानचे गहिनीमहाराज औसेकर,  राज्य प्रशासनातील सर्व संबंधित विभागाचे प्रशासकीय अधिकारी आणि  पुणे, सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी ऑनलाइन उपस्थित होते.

**<><><><><>**

आषाढी वारीच्या पालखी सोहळ्याकरता पंढरपूर पालखी मार्ग, पालखी तळ आदी ठिकाणी पाणी, वीज, आरोग्य आणि स्वच्छतेच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज संबंधित विभागांना दिले.  पुणे इथल्या विधान भवनात झालेल्या श्री क्षेत्र देहू आणि  श्री क्षेत्र आळंदी पालखी सोहळ्याच्या  पूर्वतयारीच्या आढावा बैठकीत ते बोलत  होते. इंद्रायणी नदी स्वच्छतेचं  काम तातडीनं  करावं,  पालखी सोहळा झाल्यानंतर पंढरपूर शहरात स्वच्छतेसाठी आवश्यक नियोजन करावं,  मानाच्या पालख्यांसह

इतर पालख्यांसाठी रात्रीच्या वेळी विद्युत व्यवस्था करावी, पालखी मार्गालगतच्या जागा कायमस्वरूपी ताब्यात घ्याव्यात, या जागांवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचनाही पवार यांनी यावेळी दिल्या. या पालखी सोहळ्यासाठी आवश्यक असणारा सर्व निधी शासनातर्फे पुरवला जाईल, अशी ग्वाहीही पवार यांनी या बैठकीदरम्यान दिली.

**<><><><><>**

आषाढी वारीच्या पालखी सोहळ्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं पुरवल्या जाणाऱ्या सेवा सुविधांमध्ये कोणत्याही प्रकारच्या उणीवा राहू नयेत, यासाठी सूक्ष्म नियोजन करून सर्वांनी आपली जबाबदारी चोख बजवावी, असे निर्देश **या** महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी आज महापालिकेच्या प्रशासकीय यंत्रणेला दिले.

**<><><><><>**

मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामुळं देशातल्या कलाकारांना जागतिक व्यासपीठ मिळेल. माहितीपट हा एक प्रचंड मोठा उद्योग आहे. माहितीपटांच्या माध्यमातून मनोरंजनासह स्वतःकडे आणि समाजाकडे पाहता येतं, असं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी आज केलं. या महोत्सवाच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेत ते मुंबईत बोलत होते. या महोत्सवामुळं कलेच्या प्रसारासोबतच समाजातले विविध मुद्दे सर्वांसमोर येतील आणि त्यावर पर्याय काढायला यामुळं मदत होईल, असंही ते म्हणाले. यंदाच्या महोत्सवातून चित्रपट आणि लघुपटांशिवाय डॉक बाजारही अनेक चित्रपट दिग्दर्शकांना त्यांचं काम दाखवण्याची संधी उपलब्ध करुन देईल, अशी

माहिती जाजू यांनी दिली. या वेळी महोत्सवाचे संचालक प्रिथुल कुमारही उपस्थित होते.

<><><><><>

मिफ महोत्सवातले चित्रपट यंदा पहिल्यांदाच मुंबईसह पुणे, दिल्ली, कोलकाता आणि चेन्नईमध्ये दाखवले जाणार आहे. यंदाच्या मिफमध्ये ५९ हून देशातल्या ६१ भाषांमधले १ हजारांहून अधिक चित्रपट, लघुपट आणि माहितीपटांच्या प्रवेशिका आल्या होत्या. पहिल्यांदाच या महोत्सवासाठी एवढ्या मोठ्या संख्येनं प्रवेशिका आल्या आहेत. त्यातल्या ३१४ चित्रपटांचा समावेश चित्रपट महोत्सवात झाला आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धा श्रेणीत २५ आणि राष्ट्रीय स्पर्धा श्रेणीत ७७ चित्रपट आहेत. अमृत काळातला भारत या विषयावरच्या चित्रपटांसाठी यंदाच्या महोत्सवात विशेष स्पर्धा आयोजित केली आहे.

<><><><><>

ऊसाच्या एफ आर पी मध्ये दरवर्षी वाढ होत असूनही गेली अनेक वर्षे साखरेच्या किमान विक्री दरात वाढ झालेली नाही. त्यामुळे साखर उद्योगापुढील आर्थिक अडचणी वाढत आहेत. साखरेचा किमान विक्री दर प्रती किलो 42 रुपये करण्याचा प्रस्ताव, केंद्र सरकारला सादर करण्यात आला असल्याची माहिती राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी आज पुण्यात दिली. या बैठकीत झालेल्या निर्णयांची माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

<><><><><>

नैऋत्य मोसमी पाऊस पुढच्या  चार ते पाच दिवसात राज्याच्या आणखी काही भागात दाखल होण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे.

गेल्या चोवीस तासात कोकणात आणि मराठवाड्यात मुसळधार पाऊस झाला. मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकणात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाटाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र,मराठवाडा, विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

मानवी तस्करी आणि सायबर गुन्हेगारी प्रकरणी एनआयए म्हणजे राष्ट्रीय तपास संस्थेने आज सुदर्शन दराडे या संशयिताला नाशिकमध्ये अटक केली आहे. याप्रकरणातली एनआयएकडून झालेली ही सहावी अटक आहे. भारताच्या विविध भागासह व्हिएतनाम, संयुक्त अरब अमिरात आणि कंबोडियातही पसरलेलं असल्याचं या तपासात उघड झालं आहे.

**<><><><><>**

कर्नाटकातल्या  विजापूर डेपो मध्ये परवा झालेल्या  अपघातात जखमी झालेल्या कुडाळ एसटी आगाराच्या वाहक चालकांच्या दुखापतीबाबत अद्याप पोलिसात तक्रार न नोंदवल्यामुळं कुडाळ डेपोच्या कर्मचाऱ्यांनी आज दुपारपासून कामबंद आंदोलन सुरु केलं  आहे.

**//<><><><><>//**